# सभेचा वृत्तांत

ग्रामपंचायतीचे नाव पाटेगांव गाव पाटेगांव

| दिनांक | सभेचा क्रमांक | उपस्थिती | हुद्दा | विषय नंबर | विषय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | १. मौजे - पाटेगाव येथे औद्योगिक वसाहत (MIDC) निर्माण करणे बाबत चर्चा करणे. |



# प्रोसेडींग बुक

ता. कर्जत जि. अहमदनगर

| ठराव नंबर | सभेच्या कामाचा तपशील | शेरा |
|---|---|---|
| ७ | ८ | ९ |
| | आज दि. १/०८/२०२३ मौजे - पाटेगाव ता - कर्जत जि - अहमदनगर येथील भैरवनाथ मंदिर येथे MIDC संदर्भात विशेष ग्रामसभा आयोजित केली आहे. सभेस गावातील ऐकूण इतके सदस्य उपस्थित आहेत. त्यामुळे नियमाप्रमाणे सभेचे कोरम पूर्ण झालेने सभेच्या कामकाजास सुरुवात करण्यात आली. सभेचे अध्यक्ष म्हणून गावातील जेष्ठ विधिज्ञ ॲड श्री कैलासअण्णा शंकरराव शेवाळे हे कामकाज पाहतील अशी सुचना श्री महादेव विनायक शिंदे यांनी मांडली - व त्यास अनुमोदन श्री दादासाहेब दिनकर पाटील यांनी दिले. उपस्थितांपैकी ग्रामस्थांनी खालीलप्रमाणे प्रतिक्रिया दिल्या. | |
| १ | आजच्या सभेत श्री पिंटू देवकर यांनी सांगितले की गेल्या २ महिन्यापासून आपल्या गावातील क्षेत्रावर औद्योगिक वसाहत (MIDC) होणेबाबत चर्चा चालु आहेत. परंतु ही औद्योगिक वसाहत गावातील कोणत्या गटात होणार आहे. याविषयी कोणतीही माहिती ग्रामस्थांना नाही. आमची वडिलोपार्जित जमिन असून सदर जमिनीवर फळबागा आहेत व राहती घरे आहेत. त्यामुळे अनेक कुटुंब बेघर होतील. अशी सुचना मांडली. | |
| | श्री. छगन लाड मेजर यांनी अशी सूचना मांडली की आपल्या गावातील नेमक्या कोणत्या जामिनी जाणार आहेत. व जमिनी गेलेस कोणाला कोणत्या नोकरी मिळणार आहेत तर शिपाई व वॉचमॅन, त्यामुळे त्यांनी MIDC | |

# प्रोसेडींग बुक

ता. कर्जत जि. अहमदनगर

| ठराव नंबर<br>७ | सभेच्या कामाचा तपशील<br>८ | शेरा<br>९ |
|---|---|---|
| | होणेला विरोध दर्शविला.<br>श्री. युवराज मारुती लाड यांनी असे सांगितले की MIDC झाल्यास गावातील युवकांना नोकऱ्या मिळतील. व गावातील रस्ते पक्के होतील त्यामुळे MIDC व्हावी अशी ईच्छा व्यक्त केली.<br>श्री लक्ष्मण महारनवर यांनी सांगितले की मी अनेक जागेवरील MIDC पाहिल्या परंतु प्र कि.मी परिसरात केथ्या बाभळी आहेत. त्यामुळे बाजूच्या जमिनी पिकणार नाहीत. त्यामुळे जमिनीचे मुल्यांकन कमी होईल. तसेच MIDC येण्याऐवजी पाण्याचे कॅनाल आल्यास जिरायत जमिनी बागायत होतील. त्यामुळे MIDC होऊ नये अशी सुचना मांडली.<br>श्री संदिप महारनवर यांनी सांगितले की MIDC चा ड्रोण सर्व्हे झाला. परंतु गावातील कोणत्याही ग्रामस्थांना याची पुर्वकिल्पना दिली नाही. ग्रामस्थांना व शेतकऱ्यांना विश्वासात घेतले नाही. त्यामुळे MIDC होऊ देऊ नये असे सांगितले.<br>श्री. दादासाहेब दिनकर पाटील यांनी अशी सुचना मांडली की अनेक शेतकऱ्यांच्या फळबागा आहेत. आपल्या गावातील अनेक लोकांचे जिवन शेतीवर अवलंबुन आहे. त्यामुळे सर्वांनी एकत्रित मिळून लढा देऊन विरोध करु तसेच MIDC झाल्यास व रासायनिक कंपन्या आल्यास जमिनी नापिक होतील व लोकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे | |

# प्रोसेडींग बुक

ता. कर्जत जि. अहमदनगर

| ठराव नंबर ७ | सभेच्या कामाचा तपशील ८ | शेरा ९ |
| --- | --- | --- |
| | MIDC बागायत क्षेत्रात करण्यात येऊ नये असे सांगितले.<br>श्री गोकुळ इरकर म्हणाले की गेल्या अनेक दिवसापासून आपल्या पाटेगांव व खंडाळा येथिल MIDC संदर्भात चर्चा चालु आहे. परंतु सर्व्हे होत असताना गावातील कोणालाही विचारात घेतले नाही. आपल्या गावातील वाघवाडी, शिंदेवाडी, वजारवाडी येथिल शेतकऱ्यांच्या जमिनी जाणार आहेत. त्यामुळे आपण सर्वांनी मिळून शेवाळे अण्णांच्या नेतृत्वात MIDC विरोधात लढा देऊ, असे सांगितले.<br>श्री स्वप्नील डुकरे यांनी अशी सूचना मांडली की अण्णांच्या नेतृत्वात MIDC विरोधात लढा द्यावा लागेल.<br>श्री. अर्जुन महारनवर यांनी सांगितले की आमचा आपल्या गावात MIDC होणेसाठी १००% विरोध आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थीत आपल्या पाटेगांव हद्दीमध्ये MIDC झाली नाही पाहिजे.<br>श्री. कल्याण शेवाळे यांनी अशी सूचना मांडली की MIDC च्या बाजूला ५ कि मी परिसरातील जमिनी रासायनिक कंपन्यांमुळे नापिक होणार आहेत. त्यामध्ये कोणतेही पिक घेता येणार नाही. त्यामुळे आपल्या पाटेगांव हद्दित MIDC होऊ नये. जर MIDC अधिसूचना झाली तर अण्णांच्या नेतृत्वात लढा देऊ असे सांगितले.<br>श्री भागवत कल्याण महारनवर यांनी सांगितले की गावातील सर्व जमिनी नापिक | |

Scanned by CamScanner

# प्रोसेडींग बुक

ता. कर्जत जि. अहमदनगर.

| ठराव नंबर | सभेच्या कामाचा तपशील | शेरा |
|---|---|---|
| ७ | ८ | ९ |

होतील, व पिण्याचे पाणी पिण्यायोग्य
राहणार नाही असे सांगितले.

श्री महादेव विनायक शिंदे म्हणाले की
आपल्या गावातील अनेक फळबागाचे क्षेत्र
जाईल व अनेक कुटुंबांची राहती घरे जातील
ही कुटुंबे बेघर होतील. त्यामुळे बागायत
क्षेत्रावर MIDC होण्याला विरोध आहे असे
सांगितले

अध्यक्षीय भाषणात श्री कैलास अण्णा शंकरराव
शेवाळे यांनी सांगितले की गेल्या २ महिन्या-
पासून विधानसभेत व विधानपरिषदेत पाटेगाव,
खंडाळा MIDC संदर्भात चर्चा चालु आहे. व
MIDC संदर्भात शासनाची अधिसुचना येणे
बाकी आहे. त्यामुळे मौजे - पाटेगाव हद्दितील
कोणते गट जाणार आहेत. याविषयी लोकांना
कल्पना नाही. या MIDC अंतर्गत बागायती
क्षेत्र तसेच वाघनळी, शिंगेवाडी, कुंभारवाडी
येथिल रहिवाशी वस्त्या असल्याने सदरील
क्षेत्र यामधून वगळण्यात यावे. काही शेतकऱ्यांच्या
फळबागा असल्याने अनेक शेतकऱ्यांचा उदर्निवाह
शेतीवर अवलंबुन आहे. त्यामुळे बागायती क्षेत्र
यामधून वगळण्यात यावे. पडिक, माळरान जिरायत
क्षेत्रावर MIDC करण्यास अडचण नसावी अशी
सूचना मांडली. तसेच MIDC साठी क्षेत्र संपादित
झाल्यास नॅशनल हायवेप्रमाणे प्रति गुंठे 1,76,000
रुपये याप्रमाणे रक्कम मिळावी. तसेच ज्या
शेतकऱ्यांचे क्षेत्र MIDC मध्ये जाईल. त्यांच्या
कुटुंबातील २ व्यक्तींना MIDC मध्ये नोकरी
मिळाली पाहिजे अशी सूचना मांडली.

Scanned by CamScanner

# सभेचा वृत्तांत

ग्रामपंचायतीचे नाव पाटेगाव गाव पाटेगांव

| दिनांक | सभेचा क्रमांक | उपस्थिती | हुद्दा | विषय नंबर | विषय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | २ | मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणारे विषय. |

# प्रोसेडींग बुक

ता. कर्जत जि. अहमदनगर

| ठराव नंबर | सभेच्या कामाचा तपशील | शेरा |
|---|---|---|
| ७ | ८ | ९ |
| | अशी साधक बादक चर्चा आजच्या सभेत होऊन उपस्थितांपैकी त्यांचे म्हणने मांडुन बागायत व राहत्या क्षेत्रावर MIDC होणेस बहुमताने विरोध दर्शविला. तसेच सदरिल सभेचे इतिवृत्त मा.ना श्री उदयजी सामंत उद्योगमंत्री महाराष्ट्र राज्य यांना देणेबाबत चर्चा झाली. व वरील बाबींचा सहानुभुतीपूर्वक विचार करावा असे आजच्या सभेत बहुमताने ठरले.<br>सूचक : श्री सत्यवान पंढरीनाथ भंडारी.<br>अनुमोदक : श्री सोपान बाबुराव जाधव.<br>ठराव बहुमताने मंजूर | |
| २ | आजच्या सभेत अध्यक्ष यांच्या परवानगीने एकही विषय न आलेने अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले. | |

अध्यक्ष.

ग्रामसेवक
ग्रामपंचायत पाटेगांव
ता.कर्जत जि.अहमदनगर

ॐ श्री कैलास अण्णा शेवाळे
मा. जि.प. सदस्य अहमदनगर

Scanned by CamScanner